# शिक्षणाच्या वेळी पश्चाताप करून घेण्यापेक्षा यशाची पायरी गाठा-मोटेगावकर


# न्याय टाईम्स

संपादक : बालकिशन सोनी

Mob : 94231 68902

संभाजीनगर / नांदेड /परभणी / लातूर /बीड /मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ वर्ष १२ वे अंक ३४६ पाने ६ किंमत २ रु.



# शिक्षक घोटाळ्यात ईडी ची एन्ट्री!संस्थाचालकांचे धाबे दनानले!

**नागपूर** (प्रतिनिधी) :-

नागपूर –नागपूर विभागात उघडकीस आलेल्या शिक्षक भरती घोटाळ्यात आता सक्त वसुली सांचालनालय अर्थात ईडी ची एन्ट्री झाली आहे. हजारो कोटी रुपयांच्या या घोटाळ्याचा तपास करण्यासाठी सरकारी एस आय टी ची स्थापना करण्याचा विचार करत आहे. अशावेळी ईडी ची एन्ट्री झाल्याने संस्थाचालक यांचे धाबे दनाणले आहेत.

नागपूर जिल्ह्यात बोगस शालार्थ आय डी च्या माध्यमातून तब्बल ५८० शिक्षकांची भरती झाल्याचे प्रकरण मागील महिन्यात उघडकीस आले. या प्रकरणात आतापर्यंत शिक्षण उपसंचालक यांच्यासह अनेक अधिकारी, कर्मचारी आणि शिक्षकांना अटक झाली आहे. या सगळ्या घोटाळ्याचे कनेक्शन मंत्रालयपर्यंत पोहचत असल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एस आय टी स्थापन करण्याबाबत सकारात्मक पावले उचलली आहेत.

या घोटाळ्याचा सखोल तपास नागपूर



सायबर पोलिसांकडून सुरू आहे. एनआयसी आणि महाआयटीच्या सर्वरकडून आवश्यक माहिती मागवण्यात आली आहे. दरम्यान, राज्य सरकारने देखील एसआयटी स्थापन करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. राज्यभर या घोटाळ्याची मोठी चर्चा सुरु असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी वाढत आहे. नागपूर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या या घोटाळ्यात तब्बल ५८० शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बनावट पद्धतीने नियुक्ती झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बनावट शालार्थ आयडीचा वापर करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. एका नियुक्तीच्या बदल्यात २० ते ३५ लाख रुपये घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

या घोटाळ्यात वापरलेले संगणक, लॅपटॉप, मोबाईल डिव्हाइसेस आणि विविध आयपी ॲड्रेसचा तपास करण्यात येत आहे. पोलिसांनी आरोपींच्या बँक खात्यांचा तपशील मागवला असून, वेतनाच्या व्यवहारांचीही चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे बोगस शिक्षकांना पगार मिळाल्याचे सर्व पुरावे आता गोळा केले जात आहेत. या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट भूमिका घेतली आहे. त्यांनी मागणी केली आहे की, दोषी संस्थाचालकांवर कठोर कारवाई व्हावी, परंतु निरपराध व्यक्तींना त्रास होऊ नये. ईडी, एसआयटी किंवा निवृत्त न्यायाधीशांमार्फत सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे आणि दोषींवर कठोर कारवाईचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. त्यामुळे येत्या काळात या घोटाळ्यात अनेक धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# चाकरवाडी येथे प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन





## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या हस्ते मंडप उभारणीचा शुभारंभ

**बीड** (प्रतिनिधी) :-

विसाव्या शतकातील महान संत विभूती सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या २५ व्या पुण्यस्मरणार्थ (रौप्य महोत्सवी वर्ष) निमित्त परमपूज्य पं. श्री. प्रदीप मिश्राजी यांच्या भव्य शिवमहापुराण कथेच्या आयोजनासह भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी भव्य अशा प्रकारचा मंडप उभारला जाणार असून बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभहस्ते दिनांक ३० एप्रिल रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर मंडप उभारण्याचे पूजन करून मंडप उभारणीचा शुभारंभ करण्यात येणार आहे. महादेव महाराज चाकरवाडीकर यांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना या कार्यक्रमाचे निमंत्रण दिले. यावेळी व्यापारी महासंघाचे बीड जिल्हाअध्यक्ष संतोष सोहनी, विनोद पिंगळे, दै.झुंजार नेता चे उपसंपादक अशोक वाणी, अभिषेक चरखा, पंकज भुतडा, राजू पटेल, शत्रुघ्न पटेल, मनोज देशमुख यांचे उपस्थिती होती. कार्यक्रमाचे भव्य दिव्य नियोजन पाहता उपस्थित भक्तांची संख्या १२ ते १५ लाखाच्या जवळपास राहणार आहे.



# प्रा.टी.पी.मुंडे नागापूर वाण धरणातील पाणी नदीपात्रात सोडू नये या मागणीसाठी आक्रमक!

**परळी** (प्रतिनिधी) :-

परळी शहरासह परळी तालुका परिसरातील वीस ते पंचवीस गावांना जलजीवन मिशन अंतर्गत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पाईपलाईनद्वारे नागापूर येथील वाण धरणावरून होतो मात्र काही लोक जाणीवपूर्वक स्वतःच्या हटापोटी आणि स्वतःच्या स्वार्थी राजकारणासाठी वीस ते पंचवीस गावातील नागरिकांचे जीवन उध्वस्त करू पाहत आहेत त्यामुळे वाण धरणातील पाणी नदीपात्रात सोडू नये अन्यथा तालुका परिसरातील शेतकरी व नागरिक वाण धरणात जल आंदोलन उभे



करतील आणि गरज पडल्यास नाईलाजाने जलसमाधी घेतील असा इशारा ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सरांनी बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांना दिला आहे. तीनशे शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली आणि याबाबतचे निवेदन दिले आहे. या शिष्टमंडळात विविध गावचे सरपंच, नागरिक तसेच वाण धरण पाणी बचाव कृती समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावर्षी निसर्गाने साथ दिल्याने पावसाळा समाधानकारक झाला आहे. धरणावरून परळी शहराला पाणीपुरवठा करणारी पाणीपुरवठा योजना आहे तसेच परळी तालुका परिसरातील वीस ते पंचवीस गावे पिण्याच्या पाण्यासाठी धरणावर अवलंबून आहेत मात्र काही पुढारी सामान्य नागरिकांचे जीवन उध्वस्त करू पाहत असून स्वतःच्या स्वार्थी राजकारणासाठी आणि हट्टासासाठी धरणातील पाणी नदीपात्रात सोडण्याची मागणी करत आहेत ही मागणी योग्य नाही कारण तालुक्यातील कोणत्याही गावांमध्ये सध्या

# परळीत १ मे रोजी काँग्रेसचा सद्भावना संकल्प सत्याग्रह

**परळी** (प्रतिनिधी) :-

राज्यात सामाजिक सौहार्द व महाराष्ट्र धर्म वाढीस लागावा यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने सद्भावना यात्रांचे आयोजन केले आहे. दिनांक १ मे रोजी बीड जिल्ह्यातील परळीमध्ये प्रदेश काँग्रेसच्या वतीने सद्भावना संकल्प सत्याग्रह आयोजित केला आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या सत्याग्रहात काँग्रेसच्या नेत्या खा.रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेसचे नेते व पदाधिकारी सहभागी होणार आहेत परळी शहर आणि परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या सत्याग्रहात सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी



**प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खा. रजनीताई पाटील यांच्यासह काँग्रेस नेत्यांचा सहभाग, परळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आवाहन**

केले आहे.

या सद्भावना संकल्प सत्याग्रहाच्या तयारीसाठी आज परळी येथे काँग्रेस पदाधिका–यांची बैठक पार पडली या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना राहुल सोनवणे म्हणाले की, परभणी, बीड, नागपूरसह राज्यात नुकत्याच घडलेल्या विविध घटनांनी राज्यातील सामाजिक शांतता भंग करण्याचे काम केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुरोगामी राज्यात काही शक्ती जाणीवपूर्वक वातावरण बिघडवून महाराष्ट्र अस्थिर व अशांत ठेवण्याचे पातक करत आहेत. दुर्दैवाने या विघातक शक्तींना सत्तेतून आशिर्वाद मिळत आहे. परंतु काँग्रेस पक्ष राज्यातील विविध जाती धर्मातील लोकांमधील एकता कायम रहावी व सामाजिक सौहार्द वाढावे यासाठी सद्भावना यात्रा काढत आहे. याआधी मस्साजोग ते बीड व नागपूर शहरात सद्भावना यात्रा काढण्यात आली, जनतेने या यात्रांना प्रचंड प्रतिसाद दिला असून नाशिकमध्येही अशीच सद्भावना यात्रा होत आहे. गेल्या काही













# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का ? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का ? असा प्रश्न विचारला जात आहे जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केंव्हांना केंव्हा हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोके वर काढत आहे हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही . या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेंव्हा जेंव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेंव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे. भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे. दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

पान १ वरून...

## प्रा.टी.पी.मुंडे नागापूर

तरी पाणीटंचाई निर्माण झालेली नाही मग नदीपात्रात पाणी सोडण्याचा हट्टास कशासाठी असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. वाण धरणातील पाण्याची पातळी सध्या कमी होत चालली आहे त्यामुळे पिण्याच्या पाण्याची परिस्थिती गंभीर होऊ शकते तसेच येणाऱ्या पावसाळ्यात पाऊस पडेल किंवा नाही याची शाश्वती देता येत नाही त्यामुळे नदीपात्रात धरणाचे पाणी सोडणे योग्य नाही परळी आणि परळी तालुका परिसरातील पिण्याच्या पाण्याचा विचार करता पाणी सोडणे योग्य नाही. म्हणून सामान्य नागरिकांचे जीवन उध्वस्त करत असाल व त्यांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवत असाल तर ते आपण होऊ देणार नाही आणि वीस ते पंचवीस गावातील शेतकरी समाधी घेतलील असा इशारा त्यांनी दिला आहे.

## परळीत १ मे रोजी

दिवसांपासून बीड आणि परळी परिसरातील घटनांमुळे या परिसरात सद्भावनेची आवश्यकता असल्याने परळीतील मोंढा परिसरातील गांधी स्मारक स्तंभ येथे हा सद्भावना संकल्प सत्याग्रह होत आहे, या सत्याग्रहाला परळी आणि परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, डॉक्टर, वकील, प्रतिष्ठित नागरिक अशा सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांनी केले आहे. यावेळी परळी शहर काँग्रेसचे अध्यक्ष बहादूर भाई, ड प्रकाश मुंडे, प्रकाशराव देशमुख, शिवाजीराव देशमुख यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## फुलचंदराव कराड यांचे

असे म्हणत कराड यांच्या पाच प्रतिनिधीसह धरणाची पाहणी केली.यानंतर उपविभागीय अधिकारी लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पाटबंधारे विभागाचे लोंढे, गटविकास अधिकारी संजय केंद्रे आदी तेथे आल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांच्याशी चर्चा झाली व फुलचंदराव यांना आंदोलन मागे घ्यावे अशी विनंती करत दोन दिवसांत पाणी सोडतो असे सांगितल्यानंतर मी आंदोलन मागे घेत नाही परंतु तात्पुरते स्थगित करतो असे सांगितले.तहसिलदारांनी आभार मानल्यानंतर आंदोलक माघारी फिरले.या आंदोलनात १५ ते २० गावचे शेतकरी सहभागी झाले होते.

KALYAN DAY
29/04-2025
2 6 8
22-24-64-66-84-86
28/04-2025
490 34 789

MADHUR NIGHT
29/04-2025
1 7 9
11-17-71-75-93-97
28/04-2025
567 81 470

# भाजपाने तुम्हाला सन्मान दिला, तुम्ही आता पक्षाचे संघटनात्मक काम वाढवा-भाजप प्रवक्ते राम कुलकर्णी यांचे आवाहन



**अंबाजोगाई** (प्रतिनिधी) :-

केज विधानसभा मतदारसंघातील मंडळ प्रमुखाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर आ.सौ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकार्यांचा सन्मान करण्यासाठी 'अक्षय' निवासस्थानी तातडीची बैठक बोलाविण्यात आली. ज्यामध्ये पक्षाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांची उपस्थिती होती.

या बैठकीत बोलताना प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने सन्मानाचं पद देवून विश्वास टाकल्यानंतर शहरात आणि तालुक्यात संघटनात्मक कामात कठोर परिश्रम घेतले तर नेतृत्व बळकट होते. त्याचबरोबर संघटना देखील मजबूत होवू शकते. नविन पदाधिकार्यांनी काम करताना आपल्या लोकनेत्या मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे आणि या मतदारसंघाच्या आ.सौ.नमिताताई मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना केंद्र आणि राज्य सरकारने हाती घेतलेल्या विकास योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याची आपली जबाबदारी निश्चितच असते. मंडळाच्या माध्यमातून मिळालेली जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्षमपणे पार पाडली तर खर्या अर्थाने तळागाळापर्यंत आपला विचार निश्चित पोहोचल्याशिवाय रहाणार नाही असे त्यांनी सांगितले. या मतदारसंघातील मंडळाच्या निवडी जाहिर झाल्यानंतर 'अक्षय' निवासस्थानी आमदारांच्या वतीने नुतन पदाधिकार्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेवून त्यांचा सन्मान करण्यात आला. अंबाजोगाई शहर मंडळाच्या अध्यक्षपदी - संजय गंभीरे, अंबाजोगाई पश्चिम मंडळाच्या अध्यक्षपदी - गोकुळ कदम, तर केज पुर्व मंडळ अध्यक्षपदी - भगवान केदार, केज पश्चिम - संदिप पाटील, बालाघाट बीड - राणा डोईफोडे, नेकनूर - अशोक रसाळ आदींच्या निवडी जाहिर झाल्या. यापैकी काही मंडळ अध्यक्ष उपस्थित झाल्यानंतर त्यांचा जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांनी शाल, श्रीफळ, फेटा बांधुन सन्मान केला. बैठकीत मार्गदर्शन करताना भाजपा राज्य प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी सांगितले की, आपण राज्यात नव्हे तर देशात सर्वात मोठ्या सदस्य संख्या असलेल्या पक्षाचे कार्यकर्ते असुन राज्यात दिड कोटी आपली सदस्य झाले ज्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात नेत्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई, माजी खासदार डॉ.प्रितमताई आणि आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वाखाली काम करताना सदस्य नोंदणीत प्रत्येक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. संघटनेत मिळालेली पदं खर्या अर्थाने चांगलं काम करण्यासाठी संधी असते. भाजपाचे संस्कार आणि विचार हा खर्या अर्थाने सामान्य जनतेमध्ये आपणच घेवुन जावु शकतो. ज्यांना पदं मिळाली त्यांनी आपल्यावर आलेली जबाबदारी आणि कर्तव्य भावनेतून निश्चित चांगले काम करायला हवे. मंडळ अध्यक्ष या नात्याने सर्वांना सोबत घेवुन काम तर करणे महत्वाचेच त्याहुन अधिक भाजपाचा अध्यक्ष हा जो सामान्य जनतेतला विश्वास तो टिकवण्यासाठी सर्वांग चौकटीत राहुनच काम करणे महत्वाचे. बीड जिल्ह्यात आपल्या नेतृत्वाने मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली. केज विधानसभा मतदारसंघात देखील आमदारांनी प्रचंड विकासनिधी आणला. खर्या अर्थाने जनतेपर्यंत घेवून गेलं पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविणे हे आपलंच काम असून नविन पदाधिकार्यांनी क्रियामान, क्रियाशीलता वाढवुन निष्ठेने काम केले तर आपलं नेतृत्व आणि संघटना बळकट झाल्याशिवाय रहात नाही हा सल्ला त्यांनी दिला. यावेळी केज बाजार समितीचे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, हिंदुलाल काकडे, ऍड.शरद इंगळे, महादू मस्के, पंडितराव जोगदंड, शंकर उबाळे, ॲड.शरदराव इंगळे, राणा चव्हाण, आण्णा सोनवणे, अनंत आरसुडे, सुभाष घुंडरे, बाबासाहेब शेळके, प्रशांत आदनाक, शिरीष मुकडे, गणेश रूद्राक्ष, सुनिल मस्के, गौरव लामतुरे, सत्यप्रेम इंगळे, मंदार काटे, महेश आंबड, माऊली वैद्य, विकास जाधव, शैलेष स्वामी, संतोष जिरे, दिपक कोरडे, सुनिल आडसुळ, संतोष शिनगारे, अभय केंद्रे, सोपान मोरे, योगेश कडबाने, दिपक सुरवसे, विलास काजगुंडे, राहुल कापसे, मयुर रणखांब, निकेश जगदाळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या निवडींचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

# पतसंस्थेस शिक्षकनेते संभाजी तात्या थोरात यांचा फोटो भेट



**फुलंब्री** (प्रतिनिधी) :-

फुलंब्री तालुका शिक्षक पतसंस्थेस महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राष्ट्रीय नेते संभाजी तात्या थोरात यांचा फोटो भेट देण्यात आला. शिक्षक पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष लक्ष्मीकांत कोलते यांनी शिक्षक नेते संभाजी थोरात यांचा फोटो पतसंस्था कार्यालयात लावावा अशी मागणी केली होती . या ठरावाला माजी चेअरमन मच्छिंद्र शिंदे यांनी पाठींबा दिला होता . संभाजी तात्या थोरात यांचे शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान आहे . शिक्षक भारतीचे तालुकाध्यक्ष उल्हास ढेपले यांनी शिक्षक पतसंस्थेस फोटो भेट दिला . याप्रसंगी व्यवस्थापक भगवान बखळे, शिक्षक संघाचे राज्य उपाध्यक्ष संजय भुमे, तालुका नेते कैलास व्यवहारे, तालुकाध्यक्ष लक्ष्मीकांत कोलते, नारायण जाजेवार, राम सुरवसे, योगेश खरात, सूर्यकांत खरात, शिवाजी काकडे, यशवंत जगताप, नानासाहेब सावतर, रुपेश दीक्षित आदींची उपस्थिती होती.

# दुसलगाव पोलिस पाटील यांचे निलंबन रद्द करा, ग्लोबल कहार समाज चॅरिटेबल ट्रस्टयांची मागणी



**गंगाखेड**(प्रतिनिधी) :-

दुसलगाव पोलिस पाटील सौ.संगिता लक्ष्मण कचरे यांचे निलंबन रद्द करा आशा मागणीचे निवेदन दि.२९ एप्रील सोमवार रोजी तहसिलदार गंगाखेड यांना देण्यात आले.

दुसलगाव परिसरात आनेक अवैध घटनांची माहिती प्रशासनातील अधिकाऱ्यांना देणे अवैध वाळु उपसा प्रदुषण या बाबत जागृत राहणे गोदावरी येथिल विविध घटनामध्ये मच्छिमार बांधवांच्या मदतीने प्रशासनाला मदत करणे आश्या आनेक घटना मध्ये महिला आसतांना प्रशासनाला मदत करण्याचे काम पोलिस पाटील संगिता कचरे यांनी केले होते मात्र काही लोकांनी आणी प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी पोलिस पाटील संगिता कचरे यांच्या वर चुकीचे आरोप ठेवुन त्यांना निलंबित केले हे निलंबन तात्काळ मागे घ्या व यामध्ये आसलेल्या दोषी अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही करावी व त्यांची खातेनिहाय चौकशी करावी आन्यथा सर्व महाराष्ट्र भर मोर्चे अंदोलन काढण्यात येईल आश्या मागणीचे निवेदन ग्लोबल कहार समाज चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने गंगाखेड तहसिलदार यांना देण्यात आले दिलेल्या निवेदनावर भारतीय कम्युनिष्ट पक्षाचे ओमकार पवार,महाराष्ट्र जनक्राती सेना रोहिदास लांडगे,नवनाथ कचरे,लक्ष्मण कचरे,अनुसया कचरे,यांच्या सह आनेक महिला व नागरिकांच्या स्वाक्षरी आहेत.

# प्रधानमंत्री आवास योजनेतून नव्याने घरकूल मिळविण्यासाठी सेल्फ सर्व्हे करून घ्या आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

**बीड** (प्रतिनिधी) :-

**पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिता सध्या ऑनलाईन सेल्फ सर्व्हे करणे चालू आहे. बीड मतदारसंघातील ज्या नागरिकांना घर नाही अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत ३० एप्रिल पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले**



आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी जिल्ह्याभरात सध्या सद्या सर्व्हे सुरु आहेत. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामविकास अधिकारी किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकतात. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेत आपली नोंदणी करावी, नोंदणी करण्यासाठी ३० एप्रिल ही शेवटची तारीख असून त्या अगोदर बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे**

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, नंतर आधार फेस आरडी हे ॲप देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून ॲपवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या कच्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

# अभिनव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, परळी वैजनाथ येथे दुसरी ते आठवी प्रवेश पूर्व परीक्षा २०२५-२०२६ पहिली फेरी यशस्वीरीत्या संपन्न

## आमचे ध्येय केवळ शैक्षणिक यश नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे आहे-श्री. सुर्यकांत कातकडे



**परळी** (प्रतिनिधी) :-

ज्ञान प्रबोधिनी विकास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अभिनव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, परळी वैजनाथ येथे संस्थेचे संस्थापक सचिव परळी भूषण श्री. साहेबरावजी फड साहेब , संस्थेचे अध्यक्ष श्री.राजेभाऊ जब्दे साहेब, संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. गयाबाई साहेबरावजी फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २६ एप्रिल २०२५ शनिवार रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश पूर्व परीक्षेची पहिली फेरी आज यशस्वीरीत्या संपन्न झाली.

परळी शहरातील क्रीडा, कला, संगीत, सांस्कृतिक उपक्रम, स्पर्धा आणि कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांच्या नेतृत्वगुणांना आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारी, डिजिटल वर्गखोल्या, विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय अशा विविध सुविधा देणारी शैक्षणिक उत्कृष्टता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रसिद्ध असलेल्या अभिनव प्राथमिक व माध्यमिक विद्यालय ही नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असते. ही शाळा प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देते या मुळे शाळेमध्ये विद्यार्थी व पालकांची शाळेत प्रवेश घेण्याची ओढ कायम असते. अभिनव विद्यालयाने आपल्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि समर्पणामुळे परळी वैजनाथ परिसरात विशेष स्थान निर्माण केले आहे. या शाळेमध्ये विद्यार्थी प्रवेश व शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख हा सातत्याने चढता आहे त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी विद्यार्थ्यांची प्रवेश पूर्व परीक्षा घेऊनच त्यांना प्रवेश देण्यात चे शालेय प्रशासनाने ठरविले आहे.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सूर्यकांत कातकडे सर यांनी आयोजित केलेल्या परीक्षेबद्दल विद्यार्थ्यांना नियमां बद्दल सूचना दिल्या. या परीक्षेत मराठी, गणित, इंग्रजी, सामान्य ज्ञान ,इतिहास ,भूगोल या विषयांचा समावेश होता.

परीक्षा सकाळी ११:०० ते दुपारी १२:०० या वेळेत शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने घेण्यात आली. प्रत्येक वर्गाच्या सेमी माध्यम व मराठी माध्यमसाठी स्वतंत्र प्रश्नपत्रिका तयार केल्या होत्या, ज्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता आणि शैक्षणिक तयारीचे मूल्यमापन करण्यासाठी तयार केल्या गेल्या होत्या.या परीक्षेमध्ये सुमारे ९४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपला प्रवेश निश्चित करण्याच्या दिशेने एक पाऊल टाकले. मुख्याध्यापक श्री. सूर्यकांत कातकडे सर म्हणाले, आमचे ध्येय केवळ शैक्षणिक यश नव्हे, तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवणे आहे. आजच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. आम्ही प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार प्रोत्साहन देण्यास कटिबद्ध आहोत.* त्यांनी पालकांना शिक्षणात सक्रिय सहभागाचे आवाहन केले. परीक्षेचा निकाल दोन दिवसात विद्यार्थ्यांना वैयक्तिकरित्या कळवला जाईल. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नवीन शैक्षणिक सत्र जून २०२५ पासून सुरू होईल. मुख्याध्यापक श्री. सूर्यकांत कातकडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षकवृंदाच्या सहकार्याने हे विद्यालय भविष्यातही यशस्वी विद्यार्थी घडवत राहील. उपस्थित असलेल्या पालकांनाही व्यवस्थापनाचे आणि शिस्तबद्ध आयोजनाचे कौतुक केले. ही प्रवेश परीक्षा यशस्वीरित्या संपन्न करण्याकरिता शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. तसेच विद्यार्थी व पालकांनी या परीक्षेसाठी दिलेल्या प्रतिसादाबद्दल शाळेने आभार व्यक्त केले.

### जाहीर प्रगटन
### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोद दावा प्रकरण अर्ज न. २०२५

चिंतामन आर जाधव विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, बोरफडी

पहा १.चिंतामन रामभाऊ जाधव रा.मोनगीरवाडी पो. बोरफडी ता.जि बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक नामदेव चिंतामन जाधव यांचा दि. २०/११/२००८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत बोरफडीी ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे बोरखडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २५ ४/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले सदर प्रकरणात पुढील तारीख १५-५-२०२५ ही आहे

**तहसिलदार, बीड**

### जाहीर प्रगटन
### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोद दावा प्रकरण अर्ज न.३२६/२०२४- २०२५

अभिमान पि.साहेबराव नागरगोजे विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, भवानवाडी

पहा १.अभिमान पि.साहेबराव नागरगोजे रा.भवानवाडी पो.शिवनी ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत साहेबराव बाबाजी नागरगोजे यांचा दि. २२/०४/२१५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत भवानवाडी ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे भवानवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६ ०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले सदर प्रकरणात पुढील तारीख १५-५-२०२५ ही आहे

**तहसिलदार, बीड**

### जाहीर प्रगटन
### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

जन्म नोद दावा प्रकरण अर्ज न. ३१६/२०२४-२०२५

संभाजी भागुजी जाधव विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय,सानपवाडी/जैललवाडी, सोनपेठवाडी

पहा १.संभाजी भागुजी जाधव रा.सोनपेठवाडी ता.जि बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत राहीबाई भागुजी जाधव यांचा दि. १६/०८/२०१३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत सानपवाडी/जैताळवाडी/सोनपेठवाडी ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहून जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे सोनपेठवाडी ता.जि.बीड येथील जन्म-मृत्यू रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २३/० ४/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले सदर प्रकरणात पुढील तारीख १५-५-२०२५ ही आहे

**तहसिलदार, बीड**

# कै. नारायणराव चिद्रावार स्मृती शस्त्रक्रिया शिबीर हीच खरी समाजसेवा-आ. जीतेश अंतापुरकर

**देगलूर** (प्रतिनिधी) :-

अलीकडच्या काळात समाजात असंख्य गरीब, निराधार व वृद्ध रुग्ण अनेक गंभीर आजाराने त्रस्त असतात. अशा रुग्णावर मोफ़त शस्त्र क्रिया करने हीच खरी समाज सेवा आहे. देगलूर येथे गेल्या १५ वर्षापासून कै. नारायणराव चिद्रावार स्मृती प्रीत्यर्थ पूर्णत: मोफ़त शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले जाते हीच खरी समाजसेवा आहे. आज सर्व वयोगटातील नागरिकांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक असुन गरीब रुग्णांची सेवा केली निस्वार्थरित्या झाली पाहिजे असे प्रतिपादन जीतैश अंतापुरकर यॉंनी केले आहे. ते देगलूर येथे कै.नारायणराव चिद्रावार व्याख्यानमाला समिती व उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या शिबिरात एकुण १०४ रुग्णावर मोफ़त शस्त्रक्रिया करण्यात आली. शिबीर उद्धाटण कार्यक्रमात

व्यासपीठावर उपजिल्हा रुग्णालय देगलूरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.नरेश देवनीकर, राष्ट्रवादी कांग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मीकांत पदमवार, नंदकिशोर दाशटवार माजी नगराध्यक्ष देगलूर नगर परिषद, वाय जी सोनकांबळे, शिवसेना तालुकाप्रमुख महेश पाटील एड. मोहसीन अली, भावना दाशटवार, डॉ. शेख मुजीब, डॉ.उत्तम इंगोले, डॉ. अविनाश



नामावार, डॉ. रवींद्र चिद्रावार, व डॉ.लाडके उपस्थित होते.

आपल्या वडीलांच्या स्मृती प्रीत्यर्थ समाजातील उपेक्षित व वंचित जीवन जगणाऱ्या गरीब रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करून वडीलाना वंदन केले पाहिजे, अशी कल्पना डॉ.रवींद्र चिद्रावार यांना सुचली व मागील १५ वर्षापासून भव्य मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जात आहे.आजपर्यंत दोन हज़ारपेक्षा अधिक रुग्णावर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यात अपेन्डेक्स, हार्निया, हायड्रोसील, मुळव्याध, मुतखडा, भगंदर, शिष्ठ, कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया इत्यादी आजारावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. दि. २७ व २८ या दोन दिवसात १०४ रुग्णांवर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी कै.नारायणराव चिद्रावार यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन मान्यवरांचा हस्ते करण्यात आले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून श्री किरण चिद्रावर यांनी शिबीर आयोजनामागील भूमिका स्पष्ट करताना असे म्हणाले की, येणाऱ्या पिढीला कै.नारायणराव चिद्रावार यांच्या देगलूर शहराच्या विकास कामाची व दुरद्रृष्टीची ओळख व्हावी या उद्देशाने अनेक उपक्रम आयोजन समितीच्यावतीने राबविले जातात. कै.नारायणराव चिद्रावार याचां वारसा जपण्याचे कार्य करण्यासाठीच ३९ वर्षापासून व्याख्यानमाला व १५ वर्षापासून मोफत शस्त्रक्रिया शिबिराच्या आयोजन करीत असल्याची माहिती दिली. याप्रसंगी श्री लक्ष्मीकांत पदम्वार यांनी मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की कै. नारायणराव चिद्रावार हे सर्व धर्म समभावाचे पुरस्कर्ते असलेले एक आदर्श लोकप्रतिनिधी होते. शिवसेनेचे श्री महेश पाटील भाषण करताना असे म्हनाले की, त् नारायणराव चिद्रावार स्मृतीप्रीत्यर्थ चिद्रावार कुटुंबाने केलेले कार्य हे देगलूरच्या इतिहासात विशेष नोंद घेण्यासाठी आहे, त्यांच्या सामाजिक कार्याचा इतरांनी आदर्श घेणे आवश्यक आहे. वाय जी सोनकांबले यानी देगलूर येथे मोफ़त व भव्य असे शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केल्याबदल गोर ग़रीब जनतेच्या वतीने चिद्रावार कुटुंबाचे जाहीर आभार मानले कै. नारायणराव चिद्रावार यांच्या स्मृती प्रीत्यर्थ मोफत रुग्णसेवेचे हे पवित्र कार्य अखंडपणे चालू ठेवणे हीच कै.नारायणराव चिद्रावार यांना खरी श्रद्धाजंली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ संतोष येरावार तर आभार प्रा व्यंकट खंदखूरे यांनी मानले. दोनदिवसीय शिबीर यशस्वीतेससाठी डॉ.शेख मुजीब, डॉ.लाडके यांच्यासह नांदेड व देगलूर शहरातील तज्ञ डॉक्टर व उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. याप्रसंगी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे सदस्य गुरुराज चिद्रावार, श्री अरुण चीद्रावार यांच्यासह बहुसंख्य रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक उपस्थित होते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराची पुनरावृत्ती होणे काळाची गरज प्रा.भीमराव दीपके

**देगलूर** (प्रतिनिधी) :-

देगलूर तालुक्यातील मौजे चैनपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन, पंचशील, ध्वजारोहण सौ. अनुपमा प्रदिप वाघमारे सरपंच, यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी जयंती मंडळाच्या वतीने प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून, सौ.उपसरपंच सविता मारोतराव हणेगावे, मारोती हणेगावे, प्रदिप वाघमारे, प्रकाश पाटील मा.उपसरपंच, श्याम



पाटील माजी सरपंच, पोलीस पाटील प्रतिनिधी लक्ष्मण बोरवाड, प्रकाश गवलवाड मलरेडी यालावार, मा.उपसरपंच शहापुर, नारायण वाघमारे मा. उपसरपंच

राम जेठे बिलोली, वसिम शहापुरकर पत्रकार,सुरेश नावेकर जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापिका सौ.बावगे मॅडम,सौ.वाघमारे मॅडम हनमंत हणेगावे, यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त प्रा.भीमराव दिपके यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून शिका, संघटित, संघर्ष करा असा उपदेश त्यांनी सर्व तरुणांना व नागरिकांना दिला, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टिकोन सर्व समाजाच्या लोकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी मुंबई येथे पीपल्स एज्युकेशन ची निर्मिती केली व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय ची निर्मिती करून गोरगरीब लोकांना शिक्षणाची सोय केली डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अलीकडच्या काळातील तरुणांनी अंगीकारून आपला सर्वांगीण विकास करावा

असे प्रतिपादन केले यावेळी प्रकाश पाडेवार, निवृत्ती वाघमारे,प्रकाश वाघमारे,पांडुरंग पाडेवार, विजय वाघमारे,गोंविद वाघमारे,शंकर वाघमारे,भिमराव वाघमारे, सचिन वाघमारे,कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक व बौद्ध उपासक उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन गणपत वाघमारे सर यांनी केले

# भाजपाच्या रामसिंग चव्हाण यांची फौज कामाला बूथ प्रमुख, पन्ना प्रमुखांनी बांधली संघटन मोट

**मुदखेड** (प्रतिनिधी) :-

भाजपचे नवनियुक्त नव्या उमेदीचे शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण यांनी संघटन पर्ध अभियानासाठी पुढाकार घेतला असून बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख यांनी केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध माहिती प्रत्येक घरात पोहचविण्याचा निर्धार केला असून घर चलो अभियानासाठी फौज कामाला लागली आहे.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष आ रविंद्र चव्हाण, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार भाजप तालुकाध्यक्ष व शहराध्यक्ष निवडिची प्रक्रिया नुकतीच पुर्ण करण्यात आली आहे. मुदखेड तालुक्यात भाजप संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीकोनातून राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, महानगर कार्याध्यक्ष अमर राजूरकर यांचे निकटवर्तीय व विश्वासू समजले

## शासकीय योजनांसाठी घर चलो अभियान



जाणारे दत्तु देशमुख वाडीकर यांची तालुकाध्यक्ष पदी तर शहराध्यक्ष पदी राम सिंह चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. नव्या उमेदिच्या पदाधिकार्यांनी आता शहरात भाजप संघटन पर्व अभियान जोमाने राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

भोकर विधानसभा आमदार श्रिजया चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मोट बांधली जात आहे भाजप शहराध्यक्ष रख सिंह चव्हाण यांनी बुथ प्रमुख, पन्ना प्रमुख यांची बैठक घेऊन घर तिथे कार्यकर्ता तसेच एक पन्ना २० कुटुंब अशी नियोजन आखनी केली आहे. भाजप केंद्र व राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती शहरातील प्रत्येक घरात पोहचविण्याचा निर्धार केला आहे. जुन्या निष्ठावंत पदाधिकार्यांना सोबत घेऊन मोर्चा बांधनी केली जात आहे जिल्हा महामंत्री प्रविण गायकवाड, माजी तालुकाध्यक्ष बालाजी खटींग, हनुमंत देशमुख, माजी शहराध्यक्ष संजय सोनटक्के, , गोविंद गोपनप्पले, कालिदास जंगीलवाड, कानोबा बिसमिल्ले, प्रभाकर पांचाळ, संतोष सावंत, विनोद शर्मा, अमोल आबादार यांच्या संकल्पनेतून अभियानाचा अजेंडा तयार करण्यात आला आहे. घर चलो अभियान राबविण्यासाठी माजी नगराध्यक्ष सुनिल शेट्टे, संजय आऊलवार, गंगाधर डांगे, अब्लुल कादीर, रावसाहेब चौदंते, श्याम चंद्रे, पंडरीनाथ सुर्यवंशी, नितीन चौदंते, कुणाल चौदंते, विजय मेटकर यांच्यासह आदिंनी पुढाकार घेतला आहे.

# लोह्यात ३० एप्रिल रोजी जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीच्या भव्य मिरवणुकीचे आयोजन ;

## जयंती मंडळाने केली जय्यत तयारी

**लोहा** (प्रतिनिधी) :-

शहरात दि.३० एप्रिल रोजी समतेचे पुरस्कर्ते जगत् ज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीच्या भव्य मिरवणूकीची जय्यत तयारी करण्यात आली. समतेचे पुरस्कर्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी साजरी करण्यात येणार आहे.



दि.(३०) एप्रिल २०२५ रोजी लोहा शहरातील जुना लोहा येथील महादेव मंदिर येथून महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मुर्तीची भव्य दिव्य मिरवणूक ढोल ताशांच्या गजरात भजनी मंडळी सह हती घोड्या सह मुख्य रस्त्याने मुख्य रस्त्याने लोहा नगर परिषद कार्यालयाच्या प्रांगणातील महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत काढून तेथे विसर्जित करण्यात येणार आहे.

तरी सदरील मिरवणूकीस लोहा शहर व तालुक्यातील सर्व समाज बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन सार्वजनिक महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाचे अध्यक्ष हरीभाऊ शेटे, स्वागताध्यक्ष दिपक रायफळे, कोषाध्यक्ष सतीश आणेराव, कार्याध्यक्ष गोविंदराव सोनवळे, सचिव त्र्यंबक गोरकटे, उपाध्यक्ष कैलास कहाळेकर, बसवेश्वर डोम, प्रसिद्धी प्रमुख संजय कहाळेकर यांच्यासहित सार्वजनिक महात्मा बसवेश्वर महाराज जयंती मंडळाच्या वतीने करण्यात आले.

# गोवंश हत्या बंदी कायदा राज्यात लागू असतानाही नरंगल रोड येथे उघड्यावर गोवंशमास विक्री ;

## तीन आरोपी विरोधात गुन्हा दाखल....!

**देगलूर** (प्रतिनिधी) :-

देगलूर देशोन्नती वृत्तसंकलन गोवंश हत्या बंदी कायदा राज्यात लागू असतानाही शहरातील नरंगलरोड भागात अगदी रहदारीच्या ठिकाणी उघड्यावर मास विक्री करणाऱ्या तीन आरोपी विरोधात देगलूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून ४० हजाराचा ऐवज जप्त केला.

या संदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील नरंगल रोड भागात रविवार दिनांक २७ रोजी सकाळी ९ वाजता रहदारीच्या ठिकाणी आपल्या शटर च्या दुकानातून उघड्यावर गोवंश मास विक्री करीत असताना आरोपी बिलाल फयाज कुरेशी अहेमदीया कॉलनी देगलूर ,शेख मौलाना वय ५५, घुमट बेस देगलूर, चांदखान कादरखान वय २६ वर्षे, फुलेनगर देगलुर हे आढळून आल्याने या तिघांकडे गोवंश मास विक्रीच्या अनुषंगाने काही साहित्य आढळून आले. या तिघांकडे मिळून १४६ किलो गोंवश मास आढळून आले. मास विक्री प्रकरणातील काही साहित्य मिळुन जवळपास ४० हजाराचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. पोलीस कॉन्स्टेबल बळीराम अण्णाराव घुळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून देगलूर पोलिसात या तिघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाच्या पुढील तपास ज्ञानोबा केंद्र हे करीत असल्याचे सांगण्यात आले.

# जि प प्रा शाळा वळग येथे चावडी वाचन व गणन संपन्न

**देगलूर** (प्रतिनिधी) :-

दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वळग,केंद्र कावळगाव येथे निपुण महाराष्ट्र अंतर्गत चावडी वाचन व गणन करण्यासाठी शिक्षण विस्तार अधिकारी श्री दौलताबादी साहेब व केंद्रप्रमुख सौ कुऱ्हाडे मॅडम यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी इयत्ता दुसरी पासूनच्या विद्यार्थ्यांचे वाचन क्षमता आणि गणनक्षमता यांची तपासणी केली. याप्रसंगी शा.व्य.स.अध्यक्ष,सदस्य,आणि मोठ्या प्रमाणात पालक वर्ग, विद्यार्थी आणि मुख्याध्यापक श्री.बावगे ओ. एस. यांच्यासह संपूर्ण शिक्षक उपस्थित होते.



# भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा उत्साहात

**मुदखेड** (प्रतिनिधी) :-

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती महोत्सव सोहळा उत्साहात पार पडला या निमित्त खिचडी व बुंदी लाडुचे वाटप करण्यात आले असून महामानवास अभिवादन करण्यासाठी आमदार श्रिजया चव्हाण यांनी उपस्थिती लावली होती.

मुदखेड शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र भिमनगर नयाआबादी, अशोक नगर, लुंबिनी नगर, रेल्वे कॉलनी, समता नगर, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या नियोजित जागी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव सोहळयाचे ता २७ (रविवार) आयोजित करण्यात आले होते या निमित्त भंतेजी व उपासक यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात येऊन बौद्ध वंदना करण्यात आले. विविध राजकीय पक्ष व संघटनांच्या वतीने



## खिचडी व बुंदी लाडुचे वाटप आमदार श्रिजया चव्हाण यांची उपस्थिती

महामानवास अभिवादन करण्यात आले या वेळी आमदार श्रिजया चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, करीम खां साहब, भाजप शहराध्यक्ष राम सिंह चव्हाण, कॉंग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, कॉंग्रेस शहराध्यक्ष कैलास गोडसे, जयंती मंडळाचे अध्यक्ष राजू चौदंते, सुर्यकांत चौदंते,अविनाश चौदंते, रुशिकेश चौदंते मोहम्मद गौस, युवक कॉंग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठ्ठान, शिवकांत देवके, रत्नाकर तारु वाघिकर, राहूल चौदंते, बुद्धभुषन गंगाधर थोरमोटे, विक्रांत गोद्रे, प्रदिप कांबळे, बंटी देवकांबळे, कपील लोखंडे, अशोक डोंगरे यांची उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त स्वर्गीय निवृती गंगाराम खंलोटे यांच्या स्मरणार्थ एक क्विंटल बुंदिचे लाडू वाटप करण्यात आले या सोबतच एक हजार बीसलरी बॉटल्सचे वाटप करण्यात आले. महात्मा फुले चौक मित्रमंडळाच्या वतिने अन्नदान वाटप करण्यात आले. चौदंते परिवाराच्या वतीने आयोजित अन्नदान वाटपाच्या कार्यक्रमात आमदार श्रिजया चव्हाण यांनी उपस्थिती लावली या नंतर शहरातील प्रमुख रस्त्यांवरुन महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. सार्वजनिक जयंती मंडळाने महामानवाचे आदर्श विचार आचरण करण्याची सामुहिक शपथ घेतली

# ३३ वर्षानंतर स्नेह मेळाव्याच्या माध्यमातून शाळकरी बालमित्रांनी दिला आपल्या आठवणीला उजाळा

**हिंगोली** (प्रतिनिधी) :-

कळमनुरी येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयातील सन १९९३ च्या तुकडीचा स्नेह मेळाव्याचा एक अविस्मरणीय सोहळा आयोजित करण्यात आला . जवळपास ३३ वर्षानंतर आपल्या जुन्या बालमित्रांना भेटून विद्यार्थी मित्र मैत्रिणी व शिक्षकांना भेटून भाऊक झाले होते.

दि २७ एप्रिल रविवार रोजी ठरल्याप्रमाणे कार्यक्रमाची सुरुवात सकाळी दहा वाजता सुरू झाली. सकाळपासूनच मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, वर्धा, नागपूर तसेच हिंगोली जिल्हा व कळमनुरी आदि ठिकाणावरून मित्र-मैत्रिणी येण्यास सुरुवात झाली. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारावर सर्वांचे स्वागत करण्यात आले तब्बल ३३ वर्षानंतर भेटल्याने अनेकांचे चेहरे विस्मरणात गेले होते मात्र चेहऱ्याच्या हावभवावरून व नावावरून



आपल्या बालमित्र सवंगड्याची सर्वांनाच ओळख पटली.ज्या शिक्षक वृंदांनी

कडक शिस्तीच्या माध्यमातून आम्हाला शिक्षणाची योग्य दिशा दाखवली त्या शिक्षकांना देखील बऱ्याच वर्षानंतर पाहून सर्वांचे मन भरून आले. ठरल्यानुसार कार्यक्रमाला सुरुवात झाली,सुरुवातीला क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले, स्वातंत्र्य सैनिक हुतात्मा बहिर्जी शिंदे, स्वातंत्र्यसैनिक नागोरावजी सावंत काका यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. शाळेतील दिवंगत शिक्षक व दिवंगत विद्यार्थी मित्र/मैत्रिणी तसेच पहेलगाम येथे झालेल्या आतंकवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष एडवोकेट अशोकरावजी सावंत काका व पारडकर सर, कदम सर, राऊत सर, संगीतच्या शिक्षिका देशपांडे मॅडम, सोनाळे सर, डुरे सर , निरगुडे सर, खोकले सर,काळे सर, राठोड सर, वायचाळ सर, आदी गुरुजनांचा यथोचित सत्कार व सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या शालेय अनुभवासह आपल्या स्वत:चा परिचय करून देत अनुभव कथन केले. तसेच शिक्षकांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले देशपांडे मॅडम यांनी आजही त्यांच्या सुरेख आवाजात एक गीत सादर केले, तर राठोड सर व काळेसर यांनी आपल्या सुमधुर आवाजामध्ये दोस्ताना या चित्रपटाचे गीत गात उपस्थितांची मने जिंकली दिवसभर चालणाऱ्या भरगच्च कार्यक्रमातून सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनी मनसोक्त आनंद घेत आपल्या जुन्या आठवणींना उजाळा करून दिला व अविस्मरणीय असा स्नेह मेळावा संपन्न झाला. सदरील मेळावा यशस्वी करण्याकरिता सुदर्शन सोईतकर, मनोज शिंदे, संजय सरकटे, वैभव बुरसे, शिवाजी सूर्यवंशी ,वीरभद्र सगरोळीकर अनिल गुट्टे ,धीरज डोडल, वैभव बुर्से शरद पारडकर, महेश पंचलिंगे,संतोष पाईकराव, गणेश जाधव, संगीता लाटकर,गोपाल काकडे, राहुल मेने, नारायण करंडे आदींनी परिश्रम घेतले

# पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या हस्ते पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र शेख ताहेर याना प्रदान

**संभाजीनगर** (प्रतिनिधी) :-

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई अंतर्गत पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शेख ताहेर यांची निवड करण्यात आली होती. सदरील निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांच्या शुभहस्ते संभाजीनगर येथे देण्यात आले. यावेळी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

संभाजी नगर येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष श्री गोविंद वाकडे यांच्या अध्यक्षतेखाली मराठवाडा विभागीय बैठक



पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात शनिवार दिनांक २६ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता संपन्न झाली. या बैठकीला पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या सह प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत, ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य यांची विशेष उपस्थिती लाभली.या बैठकीमध्ये संभाजीनगर येथे जून महिन्यामध्ये मराठवाडा स्तरीय पहिला विभागीय मेळावा घेण्यात यावा अशी मागणी प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केली. त्यास प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे यांनी मान्यता दिली. यानंतर मराठवाड्यातील सर्वानुमते निवड झालेल्या सर्व जिल्हाध्यक्षांना नियुक्तीचे पत्र प्रदेश अध्यक्ष श्री गोविंद वाकडे सर यांच्या शुभहस्ते देण्यात आले. पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीच्या बीड जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी शेख ताहेर यांना देण्यात आली.

यावेळी शेख ताहेर यांनी पत्रकारांनी निर्भीडपणे सत्य जनतेसमोर मांडावे जर सत्य मांडणाऱ्या पत्रकारांना कोणी धमकावले मारहाण केली तर धमकवणारी मारहाण करणारी व्यक्ती कोणीही असो त्याच्या विरुद्ध पत्रकार संघाने राज्यस्तरावर आवाज उठवावा आणि पीडित पत्रकाराला न्याय देण्यासाठी संघर्ष करावा असे मत मांडले. त्यावर प्रदेशाध्यक्षांनी सदरील सूचना अतिशय चांगली आणि योग्य आहे.मी प्रदेशाध्यक्ष म्हणून जबाबदारीने सांगतो जर प्रामाणिक पत्रकारावर कोणी हल्ला केला असभ्यवर्तन केलं तर त्याविरुद्ध जशास तसे उत्तर देण्यासाठी पत्रकार संघ लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरेल असे जाहीर केले.

# भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरातील प्रियदर्शनी चौकात रविवारी दुपारी पहलगाम हल्ल्याचा निषेध

**सिल्लोड** (प्रतिनिधी) :-

भारतीय जनता पार्टीच्या वतीने शहरातील प्रियदर्शनी चौकात रविवारी दुपारी पहलगाम हल्ल्याचा निषेध करण्यात आला. यावेळी भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पाकिस्तान विरोधी घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

पहलगाम हल्ल्याचा निषेध करीत भाजप पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी निष्पाप पर्यटकांचा बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांना पकडून फासावर लटकावण्याची मागणी केली. यावेळी पाकिस्तानचा ध्वज जाळत पाकिस्तान मुर्दाबादच्या घोषणा



देण्यात आल्या. केंद्र शासनाने कडक पावले उचलून पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा. तसेच दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी यावेळी आंदोलनकर्त्यांनी केली.

भाजपचे शहर मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू यांच्या नेतृत्वाखाली हे निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, कमलेश कटारिया, जिल्हा उपाध्यक्ष विलास पाटील, विष्णू काटकर, विजय मंडलेचा, शामराव आळणे, राजू शिरसाठ, प्रकाश भोजवणी, आकाश कुमावत, स्वप्नील शिनगारे, मयूर कुलकर्णी, मोतीराम मिसाळ, गौरव अग्रवाल, नंदू श्रीवास्तव, योगेश साळवे, राजू गायकवाड, अतुल वाघ आदी उपस्थित होते.

न्याय टाईम्स

## खोलेश्वर विद्यालयाची विद्यार्थिनी भावना साबळेचे यश

दिंद्रुड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे च्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत खोलेश्वर विद्यालय च्या ६२ विद्यार्थ्यांनी पात्र ठरत यश मिळवले आहे.इयत्ता पाचवीच्या वर्गातील विद्यार्थिनी भावना भागवत साबळे हि शिष्यवृत्तीस पात्र ठरली असुन तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दिंद्रुड (ता.माजलगाव) येथील खोलेश्वर विद्यालयात इयत्ता पाचवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली पत्रकार भागवत साबळे यांची मुलगी भावना साबळे सह खोलेश्वर विद्यालया चे ६२ विद्यार्थी पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले असून पुढील शालेय शिक्षणाकरिता शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष दिलीपराव पारेकर, विलास पारेकर, प्राचार्या सरिता फपाळ, रोहिणी पारेकर, मुख्याध्यापक संजय रायतेसर, पालकवर्गासह परिसरातून कौतुक होत आहे.

# सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मियांचे रक्तदान

## माजलगाव मठाचा आदर्श पायंडा; सामाजिक सलोख्याचे माजलगावात दर्शन



**माजलगाव** (प्रतिनिधी) :-

येथील प्रसिद्ध श्री सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थान नेहमीच सामाजिक सलोख्याला प्राधान्यक्रम देत आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सव सोहळ्यानिमित्त सर्वधर्मीय रक्तदात्यांनी सहभाग घेऊन सामाजिक सलोख्याचा आदर्श पायंडा पाडला आहे. धर्माच्या पलीकडे माणुसकीचे दर्शन घडविले, याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. दरम्यान, मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी सामाजिक सलोखा जपण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतलेला आहे.

माजलगावातील सद्गुरू श्री मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये वर्षभर आयोजित होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये आता आरोग्य शिबिराचेही आयोजन करण्याचा निर्णय मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी घेतला. रविवार, दि.२७ एप्रिल रोजी माजलगाव मठात श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या उत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी हा संकल्प केला. यामुळे माजलगाव मठामध्ये आता धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपतानाच भाविकांच्या, शिष्यांच्या शरिराच्या आरोग्याची माहिती होण्यासाठी प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

वीरशैव लिंगायत समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या माजलगाव येथील सद्गुरू मिस्किन स्वामी मठ संस्थानमध्ये श्री सद्गुरु मिस्किन स्वामी यांचा जयंती रविवारी विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळी आठ वाजता रजत पालखी सोहळा काढण्यात आला. यामध्ये श्री मिस्किन स्वामी यांची चांदीची मूर्ती पालखीमध्ये ठेवून रजत पालखी मठ, देवी मंदिर ते सिंदफणा नदीपर्यंत काढण्यात आली. नदीपात्रात श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या उपस्थितीत चांदीच्या मुर्तीला जलाभिषेक घालण्यात आला. पालखीत सहभागी महिलांनी नदीतील जल कलशात घेऊन रजत पालखी नदीपात्र ते भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, हनुमान मंदिर मार्गे माजलगावकर मठात रजत पालखीचा समारोप झाला. यानंतर नदीपात्रातील जलाने श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या समाधीस लघुरुद्राभिषक घालण्यात आला. यानंतर श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे आशीवर्चन लाभले. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी यांच्या जन्मोत्सवानिमित्त यंदा माजलगावकर मठात रक्तदान व नेत्रतपासणी शिबिर घेण्यात आले. शेवटी भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. कार्यक्रमास माजलगावसह बीड, गेवराई, लातूर, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री सद्गुरू मिस्किन स्वामी जयंती उत्सवासाठी माजलगाव येथील वीरशैव समाज तसेच युवकांनी मोठे परिश्रम घेतले.

### ४९ जणांचे रक्तदान तर १४० जणांची नेत्र तपासणी

धार्मिक कार्यक्रमातून मनाचे आरोग्य जपण्याच्या उद्देशाने यंदा श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या संकल्पनेतून जयंती उत्सवानिमित्त माजलगावकर मठात प्रथमच रक्तदान शिबिर व नेत्रतपासणी करण्यात आली. माजलगाव मठ संस्थान आणि माजलगाव ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले तर आनंदऋषी हॉस्पिटल आणि मठाच्या वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिराचा १४० जणांनी लाभ घेतला. यातील ५० नागरिकांमध्ये डोळ्यांचे दोष आढळून आले. त्यांच्यावर आठ दिवसात आनंदऋषी हॉस्पिटल अहिल्यानगर येथे मोफत ऑपरेशन व उपचार केले जाणार आहेत.

### 'मठातर्फे वर्षभर आरोग्य शिबिरे घेणार'

आरोग्य हा विषय समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. माजलगाव मठातर्फे भविष्यकाळात आरोग्य विषयक उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल. वर्षभर आरोग्य शिबीर, आरोग्य तपासणी शिबीर असे लोकोपयोगी उपक्रम राबविण्यावर मठाचा भर असेल, अशी माहिती मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

## फुलचंदराव कराड यांचे शक्तिप्रदर्शन करत वाण धरणावर जलसमाधी आंदोलन

### जिल्हा प्रशासन खडबडून जागे,दोन दिवसांत पाणी सोडण्याच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित

**परळी** (प्रतिनिधी) :-

नागापूर येथील वाण धरणातील पाणी नदीपात्रात सोडावे यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड आपल्या कार्यकर्ते,शेतकर्यांसह रविवारी वाण धरणावर पोहोचले.कराड धरणावर येताच पाटबंधारे,पोलिस व तहसिल प्रशासन खडबडून जागे होत दोन दिवसांत पाणी सोडण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.



वाण धरणातील पाणी जनावरे व पिण्यासाठी नदीपात्रात सोडावे यासाठी गत ३० वर्षांपासून प्रत्येकवर्षी प्रयत्न करणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी दि.२५ एप्रिल रोजी बीडचे नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची शिस्टमंडळासह भेट घेतल्यानंतर कराड हे रविवार दि.२७ रोजी सकाळी १०.३० वाजता आपले कार्यकर्त्यांसह पोंहचले.जलसमाधी आंदोलन करण्यासाठी फुलचंद कराड आगे बढो,वाण नदीपात्रात पाणी सोडलेच पाहिजे अशा घोषणा देत धरणाकडे निघाल्यानंतर गेटवर रोखले.यानंतरही फुलचंद कराड हे जलसमाधीवर ठाम होते.धरण परिसरात जलसंरक्षक दल व ४० ते ५० गाड्यांचा ताफा तैनात करण्यात आला होता.पोलिस,पाटबंधारे विभागाचे अधिकारी आले व त्यानंतर आम्हाला धरण बघायचे आहे

## वाल्मिकी संघटनेचे लातूर मुख्यकार्यकारी अधिकाऱ्याच्या दालना समोर लक्षवेधी बेमुदत आमरण उपोषण

**लातूर** (प्रतिनिधी) :-

अखिल भारतीय आदिवासी वाल्मिकी संघटनेच्या वतीने लक्षवेधी बेमुदत आमरण उपोषण चालू आहे . संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विशाल वसंतराव सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली हे उपोषण होणार आहे



लातूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागात प्रचंड मोठा आर्थिक गैरव्यवहार झाला आहे . त्याच्या चौकशीसाठी अनेक संस्था संघटना पत्रकार मित्र ' युट्यूबचॅनल प्रिंट मिडिया प्रतिनिधीनी अनेक वेळा बातम्या प्रसिद्ध केलेल्या आहेत . परंतु गेंड्याच्या कातडीची प्रशासकिय यंत्रणा टस की मस करीत नाही . शिपाई क्लार्क पासुन ते वरीष्ठ अधिकाऱ्यापर्यंत कोणीच कोणाला घाबरत नाही . यांच्यावर कोणताच वरिष्ठ अधिकारी कारवाई करीत नाही . म्हणजेच अर्थपूर्ण भ्रष्टाचार शंभर टक्के झालेला आहे असे समजायला हरकत नाही . लातूर जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक आस्थापनेत अनेक बोगस कर्मचारी भरती करून शासकिय निधीचा योग्य प्रकारे गैरवापार केलेला आहे . बोगस संस्था चालकांना बोगस अधिकार देवून लाखो कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे . ती बाब माहिती अधिकारात सिद्ध झाली आहे . कांही कार्यकार्यांनी पत्रकार परिषदा घेवून माहिती उघड केली आहे . कांही पत्रकारांनी नग्न अर्धनग्न आंदोलन करून भ्रष्टाचाराचा निषेध केला आहे . कांही कर्मचारी संविधानिक पद्धतीने सनदशीर मार्गाने अमरण उपोषण धरणेउपोषण सत्याग्रह आत्मदहन आंदोलन अशा प्रकारचे आंदोलन सातत्याने चालू आहेत परंतु लातूर जिल्हाचे जिल्हाधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी शिक्षण उपसंचालक कोणतेही कारवाई करायला तयार नाहीत . याचे गौडबंगाल काय आहे . राज्यामध्ये अनेक जिल्हयात शिक्षण खात्याचा भ्रष्टाचार फार गाजतोय तसेच लातूरचा सुद्धा गाजणार आहे . अखिल भारतीय आदिवासी वाल्मिकी संघटनेच्या वतीने शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करून सुद्धा प्रकरणाला न्याय मिळत नाही . अधिकारी दिलेल्या पत्राचे एक एक महिना उत्तर देत नाहीत . एखादी पत्र दिले तर त्यामध्ये दिशाभूल करणारी अधुरी माहिती दिली जाते . अ

## अंबानगरीत श्री गजानन विजय ग्रंथाचा तिन दिवशीय सामुदायीक पारायण सोहळ्याचे अयोजन

### काल्याचे कर्तन, दिपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता

**अंबाजोगाई** (प्रतिनिधी) :-

येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे अयोजन ७ मे ते १० मे दरम्यान सकाळी ७ ते१० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे.त्याची सांगता शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर पालखी उत्सव,महाआरती,महाप्रसाद 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायाण सोहळ्यास व विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादासाठी अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहन



संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप. वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपा अशीर्वादाने गेली १२ वर्षापासून श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण सोहळ्याचे व भक्ती संगीत, किर्तने व पालखी उत्सवाचे अयोजन आयोजन केले जात आहे. प्रति वर्षाप्रमाने याही वर्षी ७ मे ते १०मे २०२५ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आसुन सोहळ्याचे हे १३वे वर्ष आहे.तीन दिवशीय पारायण सोहळा प्रमुख हभप.आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते१०या वेळेत पारायण सोहळा पार पडणार आहे.पारायाण सोहळा कार्यक्रमा दरम्यान पहाटे ५ वा 'श्रींना' रुद्राभिषेक व आरती सकाळी श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुहीक पारायण,सांप्रदायी भजण,भक्ती संगीत,कु. दिपाली रघुनाथराव कुलकर्णी परतुर, प्रसाद महाराज कुलकर्णी जवळबनकर यांचे किर्तन होणार आहे.९ मे रोजी गण गण गणात बोतेच्या गजरात टाळमृंदगाचा टेकाधरत धाकटे देवघर,कुत्तर विहर, पाटील चौक, जयवंती पुल, साई गणेश मंदीर, खोलेश्वर मंदीर, चौभारा गल्ली, गौंड गल्ली मार्गे धाकटे देवघर येथे पालखी पोहचणार आहे.१० मे रोजी शनीवार रोजी हभप पुष्कर महाराज गोसीवी पैठण यांच्या काल्याचे किर्तनाने व त्यानंतर महाआरती व महाप्रसाद,सायं ७ वा श्रींचा श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ संचलित, 'सत्संग श्री गजाननाचा' व श्रींची दिपोत्सवात शेजारती होऊन कार्यकमाची सांगता उत्सहात करण्यत येणार आहे.पारायाण सोहळा, विवीध धार्मीक कार्यक्रम व महाप्रसादाचा अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भावीकानी लाभ घेण्याचे आवाहन संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### एलएलबी ३ वर्षे सीईटी परीक्षा २ मे पासून

मुंबई : राज्यातील विधी महाविद्यालयात एलएलबी ३ वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीची सीईटी ३ आणि ४ मे रोजी पाच सत्रात आयोजित करण्यात आली होती. त्यात सीईटी सेलने बदल करून ४ मे रोजी होणारी परीक्षा दोन दिवस आधी म्हणजेच २ मे रोजी घेतली जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे हॉलतिकीट आणि बदलण्यात आलेल्या तारखेची माहिती त्यांच्या ईमेल आणि एसएमएसच्या माध्यमातून दिली जाणार असल्याची माहिती सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी सोमवारी मुंबईत दिली. ४ मे रोजी नीट ची परीक्षा असून त्या दिवशी राज्यातील अनेक परीक्षा केंद्र यामुळे व्यापून राहणार आहेत, त्यामुळे एलएलबीची सीईटी देणा-या सुमारे ९ हजार विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्र आणि इतर अडचणी येत होत्या.






## दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन

### नाव नोंदणी करण्याचे आवाहन: भिक्खु धम्मशिल थेरो

**बीड** (प्रतिनिधी) :-

तथागत सिध्दार्थ गौतम बुद्ध आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने दहा दिवशीय श्रामणेर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील शिबिर बीड तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर, येथे शुक्रवार दि.२ ते १२ मे या कालावधीत होत आहे. प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीडकडून आयोजित शिबिरात नाव नोंदणीसाठी १५ वर्षावरील मुलांनी आपले नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा असे आवाहन मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांनी केले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, सध्या मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. हा सुट्ट्यांचा काळ आपल्या लहान तरुण मुलांना त्यांच्या मनावर सुसंस्कार होण्याकरिता महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे मुलांना सदर शिबिरात सहभागी करावे. त्यासाठी पालकांनी आपल्या १५ वर्षावरील मुलांचे नाव नोंदवून प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

नाव नोंदणीसाठी संपर्क

श्रामणेर शिबिराचे मुख्य संयोजक भिक्खु धम्मशिल थेरो यांच्या संयोजनात शिबिर होत असून नाव नोंदणीसाठी भास्कर सरपते ७३८७१४९२२३,अलका डोंगरे ९०२१७८६३३१, उद्धव खरात ९९२१७८०५५५, राणू डोळस ९७३०२६१२२१, वंदना वाघमारे ९२८४९७६८१९, प्रदिप घाडगे ७०२०५९१९८१, सुरेश डोळस ९७६४४८७०६८, पंडित चव्हाण ७५८८९३२७९६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## पशुपालकांनो उद्योजक व्हा!

महाराष्ट्र शासन पशुसंवर्धन विभाग बीड आयोजित राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत पशुपालकांची एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन दिनांक २/ ५ /२०२५ वार शुक्रवार रोजी लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे आयोजित केलेले आहे. राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत पशुपालकांना उद्योजक होण्यासाठी शेळीपालन, कुक्कुटपालन, वराह पालन व वैरण उत्पादनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करणे उद्योजकता विकास करणे पशूंची उत्पादकता वाढविणे वंशावळी सुधारणा करणे उद्योजकता विकास साधण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे या अभियाना अंतर्गत पशुसंवर्धन विभागामार्फत किमान २० लक्ष ते एक कोटी पर्यंतच्या योजना असून सर्वांसाठी ५० टक्के अनुदान आहे. या कार्यशाळेत या योजना विषयीची सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे मंत्री पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती पशुसंवर्धन विभागाचे मा.आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, मा. प्रादेशिक सह आयुक्त, मा. जिल्हाधिकारी व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व इतर जिल्हास्तरीय अधिकारी व विविध बँकेचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसेच बँकेचे अधिकारी सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत. तरी दिनांक २/५ /२०२५ रोजी सकाळी ठीक नऊ वाजता पशुपालकांनी उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आव्हान डॉ. पी.एल. अघाव पशुधन विकास अधिकारी विस्तार पंचायत समिती परळी वैजनाथ यांनी केले आहे.






न्याय टाईम्स हे पत्रक, प्रकाशक, मालक, संपादक बालकिशन श्रीरामजी सोनी यांनी मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे, मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, जलालपुर, परळी-वैजनाथ, तालुका.परळी-वैजनाथ, जिल्हा.बीड (महाराष्ट्र) येथे छापून प्लॉट न-४, इंडस्ट्रीयल एरिया, परळी-वैजनाथ, पिन-४३१५१५, जिल्हा.बीड (महाराष्ट्र). उपसंपादक : अजित बालकिशन सोनी, कायदेशीर सल्लागार : श्रीनिवास श्रीधरराव जोशी. (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) RNI-MAHMAR/2013/54911 P.R. No. L/123/RNP/BEED/2021-23